# पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण

पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक-पीन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७०० E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in


---

## प्रेस नोट

दिनांक :- ०९/११/२०२३

## नाशिक ग्रामीण पोलीसांची अवैध व्यवसाय विरोधी मोहीम
## दिंडोरीत चार लाखांचा गुटखा जप्त
## मागील चार दिवसात अवैध व्यवसायांविरोधात ९३ गुन्हे दाखल

---

नाशिक ग्रामीण पोलीसांनी दि. ०६/११/२०२३ रोजी पासून गुटखा विरोधी अभियान - ५ सुरू केले असून या अभियानादरम्यान अवैध गुटख्यासह सर्व प्रकारच्या अवैध व्यवसायांविरोधात कारवाई करण्यात येत आहे.

आज दिनांक ०९/११/२०२३ रोजी नाशिक ते पेठ जाणारे रोडवर आंबेगण शिवारात दिंडोरी पोलीसांना एका कारमध्ये सुमारे ४ लाख ७ हजार रूपयांचा अवैध गुटखा मिळून आला. सदर प्रकरणी इसम नामे सागर सुरेश सोनवणे, रा. मातोरी, ता.जि.नाशिक याचेविरूध्द दिंडोरी पोलीस ठाणेस कलम ३२८ भादवि प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर गुन्हयात त्यास अटक करून पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आली आहे.

सदर अभियानाअंतर्गत ग्रामीण पोलीसांचे विशेष पथकांसह, पोलीस ठाणेकडील अधिकारी व अंमलदारांनी मागील चार दिवसांत (दि. ६ ते ९ नोव्हेंबर २०२३ पावेतो) जिल्हयातील अवैधरित्या सुरू असलेले मद्य विक्री व वाहतूक, हातभट्टीची गावठी दारू, अवैध मटका / जुगार अड्डे, अवैधरित्या गुटख्याची विक्री व वाहतूक करणारे इसमांवर छापे टाकून त्यांचेविरुध्द खालीलप्रमाणे कारवाई केलेली आहेत.

| शिर्षक | दाखल केसेस | आरोपी | जप्त मुद्देमाल |
|---|---|---|---|
| दारूबंदी | ५६ | ६३ | ६,१८,५३५/- रू. किंमतीचे अवैध देशी-विदेशी मद्य व हातभट्टीची गावठी दारू |
| जुगार | १२ | ३३ | ८२,७५५/- रू. किंमतीचे मटका-जुगाराचे साहित्य साधने व रोख रक्कम |
| अवैध गुटखा | २४ | २७ | ६,९१,४०८/- रू. किंमतीचा अवैध गुटखा, पानमसाला व सुगंधीत तंबाखू |
| एन.डी.पी.एस | १ | १ | २,०००/- रू. किंमतीचा गांजा |
| | ९३ | १२४ | १३,९४,६९८/- |

तसेच जिल्ह्यातील अपघात कमी होण्याच्या दृष्टिकोनातून, नाशिक ग्रामीण घटकातील वाहतूक पोलीसांनी अवैध प्रवासी वाहतूक व वाहनांच्या कागदपत्रांच्या तपासणीची मोहीम हाती घेतली आहे. दिनांक ०६/११/२०२३ रोजी पासून वाहतूक नियमांचे उल्लंघन करणा-या एकूण ५३८ वाहन चालकांविरुद्ध कारवाई करून त्यांच्याकडून २,४१,४००/- रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

नाशिक ग्रामीण पोलीसांनी अवैध व्यवसायांविरुध्द सुरू केलेले अभियान यापुढेही अखंडीतपणे सुरू राहणार आहे. जिल्हयात अवैधरित्या सुरू असलेल्या व्यावसायांविषयी नागरिकांना काही माहिती द्यावयाची असल्यास नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस दलाचे हेल्पलाईन क्रमांक ६२६२ २५ ६३६३ यावर संपर्क साधावा, माहिती देणा-याचे नाव गुप्त ठेवले जाईल, असे पोलीस अधीक्षक श्री. शहाजी उमाप यांनी स्पष्ट केले आहे.